# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## आस्थापना विभाग

दुरध्वनी क्र:( कार्यालय) ०२४१ - २३४३६२२, २३४५१२७, २३४०५२२
२३४१४५५, २३४६०१०, २३२३०१९
फॅक्स नं.:०२४१ - २३२८८३७
Website www.amc.gov.in E-Mail: amc_ anr @ rediffmail.com


जा .क्र. आस्था. १३६२ दिनांक:- १७/०५/२०२१
१८/५/२०२१

## -: आदेश :-

**विषय:- कोरोना विषाणु ( कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**संदर्भ:-१) साथ रोग अधिनियम १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५**
**३) जा. क्र. आस्थापना १३७० दिनांक १६/०५/२०२१ रोजीचा आदेश.**

ज्याआर्थी अहमदनगर शहर व राज्यामध्ये कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग अधिनियम १८९७ दि. १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३, ४ मधिल तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याअन्वये आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या कारणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्याआर्थी, संदर्भ क्र. ०३ अन्वये अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीमध्ये कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) वाढता प्रादुर्भाव विचारात घेता, दिनांक १६/०५/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वाजेपासून ते दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत कडक निर्बंध लागु करण्यात आलेले असुन खालील परिशिष्ट अ मध्ये नमुदनुसार सुरु असलेल्या बाबी नमुद केलेल्या आहेत.

**"परिशिष्ट अ"**

**सुरु असलेल्या बाबी**

| अ. क्र. | बाबी |
|---|---|
| १ | वैद्यकीय सेवा / औषध दुकाने सुरु राहील. |
| २ | अत्यावश्यक सेवेसाठी पेट्रोल पंप नियमित वेळेनुसार सुरु राहतील. |
| ३ | घरपोहोच गॅस वितरण सेवा सुरु राहील. |
| ४ | सर्व बॅका सुरु राहतील. |
| ५ | दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री फ़क्त सकाळी ७ :०० ते ११:०० सुरु राहील. |
| ६ | पशुखाद्य विक्री सकाळी ७ :०० ते ११:०० सुरु राहील. |
| ७ | बी-बियाणे, खते व किटकनाशके दुकाने सकाळी ७. ०० ते ११.०० वाजेपर्यंत सुरु राहील. |

Scanned by CamScanner

त्याआर्थी उक्त नमुद नियम व आदेशाचे अनुषंगाने मी आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर असे आदेश देतो की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन, मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त नमुद सुरु असलेल्या बाबींच्या सर्व आस्थापनामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी / व्यवस्थापक / मालक / मॅनेजर/कामगार यांनी कोवीड-१९ च्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या नजीकच्या नागरी आरोग्य केंद्रावर अॅन्टीजेन व आरटीपीसीआरची चाचणी करुन घ्यावी व तसे प्रमाणपत्र सोबत बाळगावे.

महानगरपालिकेच्या दक्षता पथकाने आपल्या आस्थापनेस भेट देऊन अॅन्टीजेन व आरटीपीसीआरची चाचणी प्रमाणपत्राची मागणी केल्यास सदरचे प्रमाणपत्र पथकास दाखविण्यात यावे.

तरी, कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लघंन केल्यास भारतीय दंड विधान संहिता ( ४५ ऑफ़ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

( शंकर गोरे )
**आयुक्त**
**अहमदनगर महानगरपालिका**

प्रति,
१) सर्व प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र.१,२,३,४ :-
२) सर्व दक्षता पथक :- यांनी आपल्या प्रभागा अंतर्गत येणा-या भागातील उक्त नमुदनुसार दक्षता घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत - माहितीसाठी सविनय सादर.
१) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
२) मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३) मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर

**प्रत :-**
१) उपायुक्त (सा) व (कर) यांना माहितीस.
२) सहाय्यक आयुक्त (सा) व (कर) यांना माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी.
३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी.
४) वैद्यकीय अधिकारी, सर्व नागरी आरोग्य केंद्र
५) प्र. प्रसिध्दी अधिकारी, प्रसिध्दी विभाग यांना माहितीस व विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावे.

Scanned by CamScanner